प्रेसनोट पुणे दिनांक २३/१/२०१९

## लोखंडी कट्टे व पिस्टल बाळगणारे दोन रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना युनिट – ४, गुन्हे शाखेकडुन जरेबंद केले.

---

युनिट - ४ चे अधिकारी व कर्मचारी हे रेकार्डवरील शरीराविरुध्द चे गुन्हेगारांची तसेच सक्रिय गुन्हेगार यांची माहीती घेत असताना पो.ना. शिवतरे व पो.ना. रमेश चौधर यांना त्याचे बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की रेकार्डवरील गुन्हेगार नामे १) सनी बग्गा रा. दत्तनगर कात्रज पुणे व २) अक्षय आदवडे रा. अप्पर इंदिरानगर पुणे यांची त्याचे मित्रा सोबत कोजागीरी पोर्णीमेच्या दिवशी भांडणे झालेली असुन त्या भांडणाचा राग मनामध्ये धरुन सदर गुन्हेगारांनी महुवा, उत्तर प्रदेश येथुन अग्निशस्त्र व काडतुसे घेवुन आले आहेत. ते त्या मित्राचा काटा काढणार आहेत असे समजले.

आज दिनांक २३/१/२०१९ रोजी **पो.ना. शिवतरे व पो.ना.रमेश चौधर** यांना रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे १) सनि उर्फ सुशांत लालबहाद्दुर बग्गा वय १९ वर्षे रा.दत्तनगर,बग्गा निवास, धोका गल्ली,शकुन मार्बल दुकानाजवळ, कात्रज पुणे २) अक्षय श्रीकांत आदवडे वय २३ वर्षे रा. चाळ नंबर सी/५/७, व्हि.आय.टी.कॉलेज मागे, साई केबल ऑफिस जवळ, सुप्पर अप्पर इंदिरानगर,पुणे हे पेशवे तलाव कात्रज पुणे येथे अग्निशस्त्र घेवुन येणार असल्याची बातमी मिळाल्याने युनिट -४, गुन्हे शाखेचे पथकाने सदर ठिकाणी सापळा रचला. परंतु त्यांना पोलीसांची चाहुल लागल्याने पोलीसांनी त्यांचा पाठलाग करुन शिताफिने पकडले. त्याची अंगझडती घेता सनी बग्गायाचे जवळ एक पिस्टल , एक लोखंडी कट्टा व दोन काडतुसे तसेच अक्षय आदवडे याचेकडे एक लोखंडी कट्टा व दोन जिवंत काडतुसे असा एकुण ५०,८००/- रु कि.चे अग्निशस्त्र व काडतुसे मिळुन आले. त्याचे विरुध्द भारती विद्यापिठ पोलीस स्टेशन गु.र.नं. १०१/२०१९ आर्म ॲक्ट ३(२५),५(२५) व म.पो.का.कलम ३७(१)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.त्याचा तपास युनिट -४, गुन्हे शाखा करीत आहेत. यातील आरोपी विरुध्द भारती विदयापीठ पोलीस स्टेशन व खडक पोलीस स्टेशनचे हद्दीत शरीरा विरुध्दचे गुन्हे नोंद आहेत.

तसेच यापुर्वी सुध्दा युनिट -४ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी १. **खडकी पो.स्टे.गु.र.नं.** ५३/२०१९ आर्म ॲक्ट ३(२५) व म.पो.का.कलम ३७(१)सह १३५ मधील आरोपी नामे ओंकार संदिप फंड वय २६ वर्षे रा. दत्तनगर कात्रज पुणे. यांचेकडे ८१,०००/- रु कि.चे **दोन लोखंडी पिस्टल व पाच जिवंत काडतुसे** व **चतुश्रृंगी पो.स्टे.गु.र.नं.**६७/२०१९ आर्म ॲक्ट कलम ३(२५), म.पो.अधि ३७(१)सह १३५ मधील आरोपी नामे मोहीत छिंगे वाल्मीकी वय.१९ वर्षे रा.अंबिका हाईटस,तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे. २. अमोल वैजनाथ मिसाळ वय २८ वर्षे रा. सेलु फाटा, ता.खेड जि.पुणे याचेकडुन कि.रु. ३०,६००/- रु कि.चे **दोन गावठी कट्टे व दोन काडतुसे** मिळुन आल्याने त्याचेविरुध्द वरील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

**एकंदरीत युनिट -४, गुन्हे शाखा पुणे शहर यांनी या आढवड्यामध्ये एकुण ०७ अग्निशस्त्रे व जिवंत व ११ काडतुसे पकडुन आरोपींना जरेबंद केले आहे.**

सदरची कारवाई ही पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, स.पो.नि.गणेश पवार, कर्चमारी भालचंद्र बोरकर, शंकर पाटील,सुनिल पवार गणेश साळुंके,रमेश साबळे, शितल शिंदे,सचिन ढवळे, शंकर संपते, रमेश चौधर, निलेश शिवतरे, अतुल मेगे. सतिश वणवे, विशाल शिर्के यांनी केलेली आहे.

